# प्रेस नोट

नंदुरबार जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्राबाहेर येणाऱ्या शहादा तालुक्यातील ३५ व नंदुरबार तालुक्यातील ४१ अशा एकुण ७६ ग्रामपंचायतींच्या **सरपंच पदाचे आरक्षण सोडत तालुकास्तरावर दिनांक ११.१२.२०२० रोजी शहादा व नंदुरबार तहसिल कार्यालयात काढण्यात येणार आहे.**

तसेच नंदुरबार जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट असलेल्या एकुण ५१९ ग्रामपंचायतीं व अनुसूचित क्षेत्राबाहेरील ७६ ग्रामपंचायती अशा एकूण ५९५ ग्रामपंचायतीं मधील **महिला सरपंच पदाचे आरक्षण सोडत दिनांक १७.१२.२०२० रोजी ठिक ११.०० वाजता बिरसामुडा सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार येथे काढण्यात येणार आहे.** सदर आरक्षण हे (१ एप्रिल, २०२० ते ३१ मार्च,२०२५) या पाच वर्षाच्या कालावधीत सार्वत्रिक निवडणूका होऊन गठित होणाऱ्या ग्रामपंचायतीसाठी लागू असणार आहे.

कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर सदर आरक्षण काढतांना घेण्यात येणाऱ्या सभेत सार्वजनिक आरोग्य विभाग व मदत व पुर्नवसन विभाग तसेच जिल्हाधिकारी नंदुरबार यांनी वेळोवेळी दिलेल्या आरोग्यविषयक सुचना व आदर्श कार्यप्रणाली संहिता या बाबींचे पालन होण्याबाबत कटाक्षाने काळजी घेण्यात यावी.

**( बालाजी क्षीरसागर )**
**उपजिल्हाधिकारी (महसूल प्रशासन),**
**नंदुरबार**

Scanned with CamScanner